बेफिकीर कारच्या धडकेत पत्रकाराचा मृत्यू

कुडचडे-सावर्डेतील घटना; पोलिसांत गुन्हा

कुडचडे : पुढारी वृत्तसेवा

खामामळ जंक्शन येथे बेफिकीर व निष्काळजीपणे कार चालविल्यामुळे झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वार पत्रकाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे कुडचडे-सावर्डे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पत्रकारिता क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

कुडचडे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.१० च्या सुमारास खामामळ जंक्शन येथे घडली. एकनाथ गवडे (रा. केरी, फोंडा) हे आपल्या कारने कुडचडेहून सावर्डेच्या दिशेने जात असताना त्यांनी वाहन बेफिकीर व निष्काळजीपणे चालवून पुढे चाललेल्या प्लेझर दुचाकीला धडक दिली. या अपघातात स्कूटरस्वार पॉल कार्व्हालो (रा. खामामळ, कुडचडे) हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. पॉल कार्व्हालो हे एका इंग्रजी वृत्तपत्रासाठी कार्यरत होते. त्यांच्या अकाली निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रासह कुडचडे-सावर्डे परिसरात शोककळा पसरली असून अनेकांनी हळहळ व्यक्त केली आहे.या प्रकरणी कुडचडे पोलिस स्थानकात सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक प्रशांत कळेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून संबंधित कारचालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५ (ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत गुन्हा नोंद केला आहे.

महादेवभाट-वळवई येथे कार्यक्रम

सावईवेरे : महादेवभाट - वळवई येथील श्री महादेव देवस्थानात महाशिवरात्री उत्सव सोहळा येत्या रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

संघटन सृजन अभियानासाठी राज्यात ४ जिल्हाध्यक्ष नेमणार

काँग्रेसचे प्रभारी माणिकराव ठाकरे यांची पत्रकार परिषदेत माहिती

पणजी : पुढारी वृत्तसेवा

राज्यात संघटन सृजन अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी ४ जिल्हाध्यक्ष नेमण्यात येणार आहेत. त्यासाठी म्हादई, उत्तर गोवा, दक्षिण गोवा आणि कुशावती असे चार जिल्हे तयार करून जिल्हाध्यक्ष ते बूथ अध्यक्ष अशी साखळी तयार करून पक्ष संघटना मजबूत करण्यात येईल, अशी माहिती काँग्रेसचे गोवा प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पणजी : पत्रकार परिषदेत माहिती देताना माणिकराव ठाकरे. बाजूला अमित पाटकर, युरी आलेमाव, कार्लोस फेरेरा व एल्टन डिकोस्टा. (छाया : प्रभाकर धुरी)

यावेळी प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर, विरोधी पक्षनेते युरी आलेमाव, आमदार कार्लोस फेरेरा, आमदार एल्टन डिकोस्टा आदी उपस्थित होते. इंदूर येथील अधिवेशनात काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, नेते राहुल गांधी यांनी संघटन सृजन अभियान राबविण्याचा विचार मांडला होता. त्यानुसार देशातील १७ राज्यात या अभियानांतर्गत जिल्हाध्यक्ष निवडण्यात आले आहेत.गोव्यासह उत्तरप्रदेश, मणिपूर, ओडिशा आणि आसाम या ५ राज्यात जिल्हाध्यक्ष नेमण्यात येणार आहेत, असेही ठाकरे म्हणाले. ठाकरे यांनी सांगितले की,दिल्लीतून ४ निरीक्षक येणार आहेत. उत्तर गोवा जिल्ह्यासाठी शोभा ओझा, म्हादईसाठी आर. सी. कुंतिया, दक्षिण गोवा जिल्ह्यासाठी एन. रघुवीरा रेड्डी, तर कुशावतीसाठी विजय इंदर सिंघला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते गोव्यात येतील ७-८ दिवस मुक्काम करतील ,लोकांशी वन टू वन बोलतील आणि सर्वसंमतीने प्रत्येक जिल्ह्यातून ३ नावे दिल्लीला पाठवतील. क्रमानुसार तसा क्रम लावण्याची कारणे अहवालात देतील. त्यानंतर दिल्लीतून जिल्हाध्यक्षांच्या नावांची घोषणा होईल. हा कार्यक्रम १७ फेब्रुवारी ते १ मार्च या काळात होईल.दिल्लीतून आलेल्यांसोबत राज्यातील तिघे प्रत्येकासोबत निरीक्षक म्हणून जातील.जिल्हाध्यक्ष निवडीत जात,धर्म न बघता संधी दिली जाईल,असेही ठाकरे म्हणाले.

संघटनेच्या सोयीसाठी ४ जिल्हे

संघटनेच्या सोयीसाठी आम्ही उत्तर गोव्यात दोन आणि दक्षिण गोव्यात दोन असे ४ जिल्हे केले आहेत, असे ठाकरे आणि प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांनी सांगितले.पाटकर यांनी म्हादईमध्ये ८ मतदारसंघ,उत्तर गोव्यात १२ मतदारसंघ, दक्षिण गोव्यात १२,तर कुशावती जिल्ह्यात ८ मतदारसंघ असतील. अभियान तळागाळात पोचवण्यासाठी ब्लॉक अध्यक्ष, मंडल अध्यक्ष, बूथ अध्यक्ष नेमले जातील,असेही पाटकर म्हणाले.

तांबोसे-मोप : लोकसंवाद अभियानात आमदार प्रवीण आर्लेकर यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेताना आमदार प्रवीण आर्लेकर. बाजूला सरपंच सुबोध महाले व इतर. (छाया : निवृत्ती शिरोडकर)

लोकसंवादातून प्रत्येक समस्या सोडविण्यावर भर

- जनतेच्या विश्वासाला अधिक बळकटी देणारा हा उपक्रम : आमदार प्रवीण आर्लेकर

पेडणे : पुढारी वृत्तसेवा

लोकसंवाद अभियानाच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांचे प्रश्न ऐकून घेणे, त्यांच्याकडे थेट संवाद साधणे, हेच लोकसंवाद अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. जनतेच्या विश्वासाला अधिक बळकटी देणारा हा उपक्रम ठरत आहे, अशी माहिती आमदार प्रवीण आर्लेकर यांनी केली.

तांबोसे मोप येथे लोकसंवाद अभियान उपक्रम राबविण्यात आला. यावेळी आर्लेकर बोलत होते. तांबोसे मोप या पंचायत क्षेत्रातील जनतेचे प्रश्न सरकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आमदार आर्लेकर यांनी ऐकून घेतले त्यानंतर ते बोलत होते. यावेळी मोप सरपंच सुबोध महाले, पंच सदस्य नागरिक संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पेडणे मतदार संघाचे आमदार प्रवीण आर्लेकर यांनी सर्वात प्रथम कोरगाव पंचायत क्षेत्रातील जनतेचे प्रश्न ऐकण्यासाठी मागच्या आठवड्यात लोकसंवाद अभियानाचे आयोजन केले होते. त्यानंतर दुसरा कार्यक्रम मोप पंचायत क्षेत्रातील सर्व जनतेचे प्रश्न ऐकून घेण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले होते. या संवाद कार्यक्रमात स्थानिक नागरिकांनी मांडलेल्या समस्या सूचना आणि अपेक्षा हे सर्व प्रश्न आमदार प्रवीण आर्लेकर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ऐकून घेतले आणि अधिकाऱ्यांना लवकरात लवकर यावर तोडगा, काढून प्रश्न सोडवण्याची सूचना केली.

आमदार आर्लेकर यांनी, मोप पंचायत क्षेत्रातील मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांनी जे जे प्रश्न वैयक्तिक पातळीवर सार्वजनिक स्तरावर मांडलेले आहेत. त्या समस्या सरकारमार्फत सोडवण्याचा शंभर टक्के प्रयत्न असणार आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे पूर्ण पेडणे तालुक्यावर लक्ष असल्यामुळे विकास कामांना ते प्राधान्य देत असतात. त्याच पद्धतीने आगामी काळातही विकासाला प्राधान्य दिले जाणार असल्याचे आमदार प्रवीण आर्लेकर म्हणाले.

सासष्टी तालुक्यात एफडीएकडून झाडाझडती

पणजी : पुढारी वृत्तसेवा

सासष्टी तालुक्यातील जुना बाजार रोड, मडगाव येथे परवाना नसलेल्या स्टॉलची आणि अस्वच्छ परिस्थितीची तपासणी करण्यासाठी दि.१२ रोजी उशिरा तपासणी मोहीम राबविली.

सासष्टी : आस्थानातील अस्वच्छता.

यावेळी ३ अन्न विक्री दुकाने, २ किरकोळ दुकाने, ३ रेस्टॉरंट्स आणि एका बेकरीची तपासणी करण्यात आली. परवाना नसलेल्या ज्यूस सेंटरला स्पॉट इन्स्पेक्शन रिपोर्टसह एफएसएसएआय कायदा २००६ च्या कलम ३१ अंतर्गत सूचना देण्यात आली. येथील १ किरकोळ विक्रेता ३५,६०० रु. किमतीच्या कालबाह्य अन्नपदार्थांची विक्री करताना आढळला.

गोवा सरकार
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, विद्युत खाते, विभाग-२(एस आणि डब्ल्यू), आके, मडगाव-गोवा, ४०३६०१

६३०केव्हीए, वितरण ट्रान्सफॉर्मर, ईईएल-१ च्या पुरवठ्यासाठी आयएस ११८०(भाग-१) २०१४ सुधारणा क्र. ४ नुसार निविदा सूचना क्र. २१/ईटी/२५-२६ जारी करण्यात आली आहे आणि ती इच्छुक पुरवठादारांच्या सहभागासाठी https://eprocure.goa.gov.in या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आली आहे.

सादर करण्याची अंतिम तारीख : २६/०२/२०२६

डीआय/जाहिरात/२३८८/२०२६

IN THE COURT OF THE INSPECTOR OF SURVEY AND LAND RECORDS, MARGAO GOA.
Case No. 5/ISLR/DEM/Sal/Deus/43/25

I. Devdatt Shrikant Lotlikar r/o 2nd Palvem, Chinchinim, Salcete Goa 403715
....Applicant

V/s

1. Lourenco Pinto, Resident of 2 Palvem, Chinchinim, Salcete, Goa - 403715. 2. Belmira Vaz e Pinto (Deceased) Resident of 2nd Palvem, Chinchinim, Salcete, Goa - 403715. 3. Maria Rosalina Marta Silva alias Rosalina Marta da Silva, Resident of 2nd Palvem, Chinchinim, Salcete, Goa - 403715. 4. Benson Borgio Secundo Netuano De Jesus Almeida alias Benson Almeida, Resident of 2nd Palvem, Chinchinim, Salcete, Goa - 403715. 5. Srikant Vitol Lotlikar (Deceased) Resident of 2nd Palvem, Chinchinim, Salcete, Goa-403715. 6. Jose Nicolau Antonio Dias Resident of 2nd Palvem, Chinchinim, Salcete, Goa-403715. 7. Sevila Dias Resident of 2nd Palvem, Chinchinim, Salcete, Goa - 403715. 8. Ulhas Shrikant Lotlikar, Resident of 2nd Palvem, Chinchinim, Salcete, Goa - 403715. 9. Ubaldino San Judas T. Dias, Resident of 2nd Palvern, Chinchinim, Salcete, Goa-403715. 10 Cominunidade of Deussua Chinchinim, Salccte, Goa - 403715. 11. Emestina Emiliano Lacerda 12. Norma Emiliano Laecrda 13. Llario Emiliano Lacerda 14. Mathilda iiario Lacerda 15. Philomena Egidio Lacerda 16. Leslie Emiliano Lacerda 17. Egidio Eleutherius Lacerda alias Egidio Emiliano Laceda, All R/o 2nd Palvem, Chinchinim, Salcete Goa 403715
.....Respondent

PUBLIC NOTICE

WHEREAS, the above named applicant moved an application to this court for Demarcation of HIS/HER/THEIR/ITS SHARE UNDER SECTION 114 of Land Revenue Code 1968 in respect of the property surveyed under Survey No. 9/15-A of Deussua village of Salcete Taluka.
AND WHEREAS, the applicant served the notices through Registered A.D. to the adjoining holder
AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Deceased, Unknown"etc.
AND WHEREAS, the applicant has prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule(20(I-A) of civil procedure code, 1908 as the applicant has stated his inability to submit the detailed addresses of the above respondents and their legal heirs.
AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such permission.
NOW THEREFORE, Notice is therefore given to the adjoining holders / legal heirs and all the interested parties to appear on **17/03/2026 at 3.30 pm** to file their say on the said date and time, In The Court of Inspector of Survey and Land Records Margao Goa. failing which the matter will be heard and determined in their absence.
Given under my hand & seal of this office on this 2 day of February 2026.

SEAL
Sd/-
Sudesh K. N. Bhaireli
Inspector of Survey & Land Records, Margao Goa.

GKB OPHTHALMICS LIMITED
CIN : L26109GA1981PLC000469
Regd. Office : 16-A, Tivim Industrial Estate, Mapusa Goa - 403 526
Tel. No. (0832) 6714444, E-Mail : gkbophthalmics@gkb.net Website : www.gkb.net

३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाही अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षांचा घोषवारा

रु. लाखात, प्रतिशेअर मुल्य वगळता

अ. क्र.	तपशील	स्टॅण्ड अलोन						कन्सोलेटेड					
		तिमाही अखेर			नऊमाही अखेर		वर्ष अखेर	तिमाही अखेर			नऊमाही अखेर		वर्ष अखेर
		३१/१२/२४	३०/०९/२५	३१/१२/२४	३१/१२/२५	३१/१२/२४	३१/०३/२५	३१/१२/२५	३०/०९/२५	३१/१२/२४	३१/१२/२५	३१/१२/२४	३१/०३/२५
		अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	लेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	अलेखापरिक्षीत	लेखापरिक्षीत
१.	व्यवहारांपासूनची एकूण मिळकत	४३६.१०	६१०.६४	७४४.६७	१,९२४.२३	२,४३२.३१	३,२७४.९४	५,६७९.३५	३,०१७.२२	२,५८०.४१	११,९२७.०८	७,७९६.४७	१०,८९८.७६
२.	(करपूर्व कालावधीसाठी, अपवादात्मक आणि/किंवा असामान्य वस्तू) निव्वळ नफा/(तोटा)	९१.०६	(५०.४७)	(१५.७४)	(१७१.९२)	(३५९.८३)	(६०३.६३)	६६.५०	१९४.१९	(१८२.८६)	२०५.७१	(२९६.२८)	(६९०.९३)
३.	कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक वस्तूंनंतर आणि करपूर्व)	९१.०६	(५०.४७)	(१५.७४)	(१७१.९२)	(३५९.८३)	(६०३.६३)	६६.५०	१९४.१९	(१८२.८६)	२०५.७१	(२९६.२८)	(६९०.९३)
४.	कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक वस्तूंनंतर आणि करोत्तर)	९८.०८	(५२.२६)	(१६.७४)	(१६८.४८)	(३६२.८४)	(६१०.७९)	७०.७२	१८४.१२	(१९०.५३)	१९०.७७	(२९५.०४)	(७०७.९२)
५.	कालावधीसाठी एकूण व्यापक मिळकत ((करोत्तर) कालावधीसाठीचा नफा/(तोटा) आणि इतर व्यापक मिळकत (करोत्तर)सहीत).	११८.०५	(५७.३५)	(१९.६०)	(१५८.६९)	(३७१.४१)	(६३१.१५)	४०.०९	५३.२७	(२८२.२४)	(२.०२)	(४१४.३४)	(८६१.२२)
६.	समभाग भांडवल	५०४.०६.	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६	५०४.०६
७.	मागील वर्षाच्या ऑडीटेड ताळेबंदमध्ये दाखवण्यात आलेले रिझर्व्हस (रिव्हॅल्यूएशन रिझर्व्हस वगळून)	-	-	-	-	-	१,२६३.३६	-	-	-	-	-	४,६९९.८३
८.	दर शेअर मिळकत (दर्शनी मूल्य रू.१०/- प्रत्येकी) (चालू आणि खंडीत व्यवहारांसाठी)												
	बेसिक (रू.)	१.९५	(१.०४)	(०.३३)	(३.३४)	(७.२०)	(१२.१२)	०.८८	३.१७	(४.०३)	२.०३	(६.९४)	(१३.९८)
	डायल्युटेड (रू.)	१.९५	(१.०४)	(०.३३)	(३.३४)	(७.२०)	(१२.१२)	०.८८	३.१७	(४.०३)	२.०३	(६.९४)	(१३.९८)

नोंदी:
१. ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या वरील लेखापरीक्षित नसलेल्या स्वतंत्र वित्तीय निकालांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकीत त्यांना मान्यता दिली आहे, जे कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन आहेत.
२. कंपनीचे कामकाज प्रामुख्याने प्लास्टिकच्या बनवलेल्या अपूर्ण ऑप्थाल्मिक लेन्सच्या निर्मिती आणि विक्रीशी संबंधित आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी निर्णय निर्माते (CODM) कंपनीच्या कामकाजाचे पुनरावलोकन एकच ऑपरेटिंग विभाग म्हणून करतात. म्हणूनच कोणताही स्वतंत्र विभाग माहिती कळवलेली नाही.
३. वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजमध्ये दाखल केलेल्या तिमाही आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. तिमाही आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळावर (www.bseindia.com) आणि कंपनीच्या संकेतस्थळावर (www.gkb.net) उपलब्ध आहे.
४. वरील निकाल खाली दिलेल्या क्विक रिस्पॉन्स कोड द्वारे देखील मिळू शकतात.

ठिकाण : म्हापसा-गोवा
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२६

जीकेबी ऑप्थालमिक्स लिमिटेड करिता
सेड्रिक लोबो
पूर्णवेळ संचालक,
डीआयएन : ०९१२४७४६

आरटीआय अर्जावर विलंब बेकायदेशीर

आठवड्यात माहिती देण्याचे आदेश

पणजी : पुढारी वृत्तसेवा

माहिती अधिकार कायद्याअंतर्गत (आरटीआय) मागितलेली जमीन नोंदवहीची माहिती देण्यास विलंब करणे बेकायदेशीर आहे असे निरीक्षण करत एका आठवड्यात विनामूल्य ती देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने पेडणे येथील सर्वे व भूअभिलेख निरीक्षक कार्यालयाच्या सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यास (पीआयओ) दिले आहेत.

आरटीआय कायद्यानुसार २०२३ मध्ये अर्ज केलेल्या पेडणे तालुक्यातील हरमल येथील नारायण पै यांनी राज्य माहिती आयोगाने त्यांचे अपील फेटाळल्याच्या आदेशाला आव्हान देत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने याचिका मंजूर करत आयोगाचा आदेश रद्दबातल ठरवला. न्यायालयाने नमूद केले की, आरटीआय कायद्यातील कलम ७(१) नुसार ३० दिवसांच्या आत निर्णय देणे बंधनकारक असताना संबंधित पीआयओने निर्धारित कालावधीत कोणताही निर्णय घेतला नाही. त्याऐवजी अर्जदारास नोंदींची पाहणी करण्यास सांगण्यात आले, जे अर्जातील स्पष्ट मागणीच्या विरोधात होते. ही बाब माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन असल्याचे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने संबंधित अधिकाऱ्यास मागितलेली माहिती एका आठवड्याच्या आत विनामूल्य देण्याचे निर्देश दिले आहेत.

ट्रेड-विंग्ज लिमिटेड
सीआयएन : L63040GA1949PLC000168
नोंदणीकृत कार्यालय पत्ता : १ला मजल, नाईक बिल्डिंग, डॉन बॉस्को हायस्कूल समोर, महात्मा गांधी रोड, पणजी, गोवा -४०३ ००१
टेलिफोन -०२२-४२३० ९४५५, **ई-मेल :** companysecy@twltravel.com, **वेबसाईट**- www.tradewings.in

३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या अलेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित आर्थिक निकालांच्या विवरणाचा उतारा

(रूपये लाखात दर शेअर मूल्य वगळता)

तपशील	स्टँडअलोन						कन्सोलिडेटेड					
	संपलेली तिमाही			संपलेले नऊमाही		संपलेले वर्ष	संपलेली तिमाही			संपलेले नऊमाही		संपलेले वर्ष
	३१/१२/२०२५	३०/०९/२०२५	३१/१२/२०२४	३१/१२/२०२५	३१/१२/२०२४	३१/०३/२०२५	३१/१२/२०२५	३०/०९/२०२५	३१/१२/२०२४	३१/१२/२०२५	३१/१२/२०२४	३१/०३/२०२५
	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(ऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(अनऑडीटेड)	(ऑडीटेड)
कामकाजामधून मिळालेले एकूण उत्पन्न	५५५९.२४	५२९४.७१	५५४०.६६	१६९०९.६१	१६०१८.४५	२१२४४.४५	६७१२.३१	५८८९.७९	६७५८.३७	१९३६१.६९	१८५९०.९०	२४९३९.६२
कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	७.६९	२.०९	१०.५९	९.२२	-६२.०७	६०.८०	१२१.४९	-१९४.१७	२८१.२४	-५६.८९	४१.१४	३६१.५२
करापूर्वीचा कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर)	७.६९	२.०९	१०.५९	९.२२	-६२.०७	६०.८०	१२१.४९	-१९४.१७	२८१.२४	-५६.८९	४१.१४	३६१.५२
करानंतरचा कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर)	७.६९	२.०९	१०.५९	९.२२	-६२.०७	५७.२१	१२१.४९	-१९४.१७	२८१.२४	-५६.८९	४१.१४	३८०.३४
कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न कालावधीसाठी नफा / (तोटा) (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट करून	७.६९	२.०९	१०.५९	९.२२	-६२.०७	४९.०५	१२१.४९	-१९४.१७	२८१.२४	-५६.८९	४१.१४	३७७.६७
इक्विटी शेअर भांडवल (इक्विटी शेअरचे दर्शनी मूल्य १०/- रुपये प्रति शेअर)	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००
राखीव निधी (मागील वर्षाच्या ऑडिट केलेल्या ताळेबंदात दर्शविलेले पुनर्मूल्यांकन राखीव वगळून)	०.००	०.००	०.००	०.००	०.००	-१५७.१६	०.००	०.००	०.००	०.००	०.००	-१४२६.७७
प्रति शेअर उत्पन्न (असाधारण बाबींपूर्वी) (प्रत्येकी १०/- रुपये) (सुरू असलेल्या ऑपरेशन्ससाठी)												
	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००	३०.००
बेसिक	०.२६	०.०७	०.३५	०.३१	-२.०७	१.९१	४.०५	-६.४७	९.३७	-१.९०	१.३७	१२.६८
डायल्युटेड	०.२६	०.०७	०.३५	०.३१	-२.०७	१.९१	४.०५	-६.४७	९.३७	-१.९०	१.३७	१२.६८

नोट :
(१) वरील माहिती ही सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे सादर केलेल्या ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीच्या अलिप्त आणि एकत्रित आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. वार्षिक अलिप्त आणि एकत्रित आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.tradewings.in वर उपलब्ध आहे.
(२) वरील निकालांचे ऑडिट समितीने पुनरावलोकन केले असून १२ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकीत संचालक मंडळाने ते दप्तरी घेतले आहेत. चालू तिमाही आणि आर्थिक वर्षाचे निकाल कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून लेखापरिक्षित आहेत.
(३) ट्रेड विंग्स हॉटेल्स लिमिटेड या पूर्ण मालकीच्या उपकंपनीतील गुंतवणुकीच्या घसरणीसाठी (impairment) आर्थिक निकालांमध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही, कारण व्यवस्थापनाला उपकंपनीच्या निकालांमध्ये 'गोईंग कन्सर्न' तत्त्वावर सकारात्मक कल अपेक्षित आहे.
(४) हे आर्थिक निकाल कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित केलेल्या भारतीय लेखा मानकांनुसार (Ind-AS) आणि वेळोवेळी सुधारित केलेल्या संबंधित नियमांनुसार आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३३ नुसार तयार करण्यात आले आहेत. Ind-AS १०८, 'ऑपरेटिंग सेगमेंट्स' नुसार, कंपनीच्या लेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित आर्थिक निकालांमध्ये विभागाची माहिती (Segment information) प्रदान करण्यात आली आहे.
(५) मागील कालावधीची आकडेवारी आवश्यकतेनुसार पुनर्गठित/पुनर्वर्गीकृत केली गेली आहे, जेणेकरून ती या कालावधीच्या वर्गीकरणाशी सुसंगत राहील.
(६)भारत सरकारने २१ नोव्हेंबर २०२५ पासून लागू केलेल्या चार नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीनुसार, होल्डिंग कंपनीने परिणामी आर्थिक परिणामांचे मूल्यांकन केले आहे आणि ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या आर्थिक निकालांमध्ये ग्रॅच्युइटीसाठी रु. ४६.७२ लाख आणि नुकसान भरपाई रजेसाठी (compensated absences) रु. ११.७५ लाख अशी एकूण ५८.४७ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद केली आहे. कंपनी नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीशी संबंधित घडामोडींवर लक्ष ठेवून आहे.

स्थळ: मुंबई
दिनांक: १२ फेब्रुवारी २०२६

ट्रेड विंग्स लिमिटेड करिता,
(डॉ. शैलेंद्र पी. मित्तल)
व्यवस्थापकीय संचालक

भव्य गोवेश्वर महाशिव मंदिराचे उद्या उद्घाटन

गोवेश्वर महिमा संहिता ग्रंथाचेही लोकार्पण

- भव्य शोभायात्रेने प्राणप्रतिष्ठा सोहळा सुरू

पणजी : पुढारी वृत्तसेवा

प.पू. रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांनी स्थापन केलेल्या बायंगणी जुने गोवे येथील उपपीठ परिसरात उभारण्यात आलेल्या भव्य असा श्री गोवेश्वर महाशिव मंदिराचा उद्घाटन सोहळा रविवार, दि. १५ रोजी प.पू. रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, कानिफनात महाराज, राज्यपाल पुसापती अशोक गजपती राजू, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. दि. १३ ते १५ फेब्रुवारीदरम्यान या मंदिराचा भव्य प्राणप्रतिष्ठा आणि कलशारोहण सोहळा होत आहे.

शुक्रवारी जुने गोवे ते मठापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेल देशभरातून आलेले हजारो भाविक व संत मंडळी सहभागी झाली होती. हर हर महादेवच्या घोषणा देण्यात आल्या. दुपारनंतर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा प्रारंभ जगतगुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या उपस्थितीत झाला.

१५ रोजी दुपारी १२ वा. श्री गोवेश्वर महाशिव मंदिरात स्थापना, उद्घाटन, कलशरोहण आणि १४०० पानी गोवेश्वर महिमा संहिता या ग्रंथाचे लोकार्पण वरील मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

या सोहळ्याला आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत ज्ञानदास महाराज, विविध आखाड्यांचे महंत आणि साधू-संत या सोहळ्याला उपस्थित राहतील. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत प्राणप्रतिष्ठा विधीत सपत्नीक सहभागी होणार आहेत.

पाषाणातील कोरीव कलाकृती हे मंदिर स्थापत्यशास्त्राचा एक अजोड नमुना आहे, मंदिराचे संपूर्ण रेखाटन जगतगुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांनी स्वतः केले आहे. वाराणसी (काशी) येथील प्रसिद्ध चुनार जातीच्या दगडांचा वापर करून हे मंदिर उभारण्यात आले आहे. प्राचीन भारतीय मंदिर शास्त्राचा अवलंब करत, या बांधकामात कोठेही लोखंडाचा वापर करण्यात आलेला नाही. मंदिररचना नागर शैलीतील आहे